महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१५१८/प्र.क्र. ०९/प्रनिप्रा/१ee    दिनांक : 8 FEB 2021

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या १९ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, .... सदस्य
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
(दूरदृष्य प्रणालीद्वारे)

२) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) .... सदस्य
सदस्य सचिव तथा महासंचालक,
महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
(दूरदृष्य प्रणालीद्वारे)

३) डॉ. धनराज माने, .... सदस्य
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.
(दूरदृष्य प्रणालीद्वारे)

४) डॉ. के.डी. चव्हाण, .... सदस्य
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
(दूरदृष्य प्रणालीद्वारे)

५) श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.), .... सचिव
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य.

१) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, व २) डॉ. अभय वाघ, सदस्य तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.



**(जे. पी. डांगे)**
**अध्यक्ष**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य**

डॉ. टि.पी. लहाने, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, डॉ. ए.एस. व्यास, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व डॉ. एस.के. महाजन, सहसंचालक तथा परिक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

विषय क्रमांक १ : **मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या १८व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची नोंद घेण्यात आली.

विषय क्रमांक २ : **दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे (माहितीस्तव).**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार घेण्यात आलेल्या निर्णयांस अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी खालील प्रमाणे सादर केला,-

| अ. क्र. | विषय सुची क्रमांक | दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १) | ३(ब) | अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) (एक) नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी विहित कालावधीमध्ये प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधीत संचालकांना सादर न केल्या प्रकरणी. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/ अभ्यासक्रमांची cut-off-date दिनांक ३१/०८/२०२० निश्चित करण्यात आली होती, तद्नुषंगाने संबंधीत अभ्यसाक्रमांच्या महाविद्यालयांनी १५ दिवसांच्या आत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक होते, तथापि, महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार कार्यवाही केलेली नाही. या अनुषंगाने मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या बैठकीतील निद्रेशानुसार सर्व संबंधीत महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या पत्रानुसार कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत व १० दिवसांत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. |



**(जे. पी. डांगे)**
**अध्यक्ष**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य**

डॉ. टि.पी. लहाने, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, डॉ. ए.एस. व्यास, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व डॉ. एस.के. महाजन, सहसंचालक तथा परिक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

विषय क्रमांक १ : **मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या १८व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची नोंद घेण्यात आली.

विषय क्रमांक २ : **दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे (माहितीस्तव).**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार घेण्यात आलेल्या निर्णयांस अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी खालील प्रमाणे सादर केला,-

| अ. क्र. | विषय सुची क्रमांक | दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १) | ३(ब) | अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) (एक) नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी विहित कालावधीमध्ये प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधीत संचालकांना सादर न केल्या प्रकरणी. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/ अभ्यासक्रमांची cut-off-date दिनांक ३१/०८/२०२० निश्चित करण्यात आली होती, तद्नुषंगाने संबंधीत अभ्यसाक्रमांच्या महाविद्यालयांनी १५ दिवसांच्या आत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक होते, तथापि, महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार कार्यवाही केलेली नाही. या अनुषंगाने मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या बैठकीतील निदे्रशानुसार सर्व संबंधीत महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या पत्रानुसार कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत व १० दिवसांत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. |



**(जे. पी. डांगे)**
**अध्यक्ष**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य**

| अ. क्र. | विषय सुची क्रमांक | दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| २) | ३(क) (१) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या प्रवेश पडताळणी/छाननी प्रक्रिये दरम्यान आढळलेल्या त्रुटीं संदर्भात. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये संचालनालय व प्राधिकरण स्तरावर तपासणी/छाननी प्रक्रिये दरम्यान ज्या त्रुटी आढळलेल्या आहेत, अशा त्रुटींचे निराकरण करण्याबाबत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीचे कार्यालयीन आदेश दिनांक २२/०१/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. |
| ३) | ३(क) (२) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या ज्या महाविद्यालयांनी प्राधिकरणाची प्रक्रिया शुल्क अदा केलेले नाही, अशा महाविद्यालयांच्या संदर्भात. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक पदव्युत्त्र वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या ज्या महाविद्यालयांनी प्राधिकरणाच्या प्रक्रिया शुल्काचा विहित कालावधीमध्ये भरणा केलेला नाही, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रक्रिया शुल्काचा भरणा करण्याकरिता शेवटी संधी म्हणुन दिनांक २५/०१/२०२१ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे. |
| ४) | ३(क) (३) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींबाबत. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक वैद्यकीय/दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या १२ तक्रारी संदर्भात मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या पूर्व परवानगीने सुनावणी निश्चित करण्यात येईल. |

उक्त अहवालाचे अवलोकन करुन प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश पारीत केले,-

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार विहित कालावधीमध्ये प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधीत संचालकांना सादर न केल्या प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजी सर्व संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे, प्रस्तूत प्रकरणी अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लघन केल्याप्रकरणी संबंधीत सर्व महाविद्यालयांचा खुलासा व त्याची पूर्तता प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या महाविद्यलयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत प्राधिकरण योग्य तो निर्णय घेईल.

२) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या तपासणी/छाननी प्रक्रिये अंती ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठित करण्यात आलेली असून, सदरील उपसमितीने त्यांचा अहवाल दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ रोजी प्राधिकरणास सादर करावा. सदरील अहवाल प्राप्त झाल्यांनतर प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये उचित कार्यवाहीकरिता सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३) अधिनियम २०१५ मधील १६(३) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शासकीय महाविद्यालये वगळून ज्या महाविद्यालयांनी अद्याप प्राधिकरणाच्या प्रक्रिया शुल्काचा पुर्णत: भरणा केलेला नाही, अशा महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही.

४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान उध्दभवलेल्या तक्रारींसंदर्भात सुनावणी होणार असून, सुनावणीनंतर संबंधीत महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी निर्णय घेण्यात येईल.

५) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या बैठकीतील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी **परिशिष्ठ - अ**, **परिशिष्ठ - ब**, **परिशिष्ठ - क** व **परिशिष्ठ - ड** नुसार तंतोतत व काटेकोरपणे अंमलबजावणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी यांनी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करावा.

**विषय क्रमांक ३ :** **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रस्तावांची प्रक्रिया.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण करत असल्याबद्दल संबंधीत सर्व संचालक, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष आणि प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालय यांचे अभिनंदन केले.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्याशी निगडीत B.Sc. Optimetroy या अभ्यासक्रमाचा प्रवेश प्रक्रियेच्या यादीमध्ये नियमानुसार समावेश करण्याबाबत संचालकांना निर्देश दिले.

प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार **(परिशिष्ठ - इ)** काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) मधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्याचे संबंधीतांना निर्देश दिले.

**विषय क्रमांक ४ :** **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील गुणवत्ता व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व तद्नुषंगाने विविध सेवापुरावठादार यांची नियुक्ती, प्रक्रिया, अदांजित प्रति विद्यार्थी खर्च व इतर यासंदर्भात आढावा.**

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व इतर तद्नुषंगिक बाबींशी संबंधीत माहिती प्राधिकरणास अवगत केली, तसेच या संदर्भात Project Management Consutants (PMC) म्हणून M/s. Price Waterhouse Coppers (PwC) यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. M/s. Price Waterhouse Coppers यांनी सामाईक प्रवेश परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व प्राधिकरण स्तरावरील प्रवेश मान्यता याबाबत प्राधिकरणास संगणीकृत (Powerpoint Presentation) सादरीकरण केले. या



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सादरीकरणाबाबत बैठकीत समाधान व्यक्त करण्यात आले. तद्नुषंगाने बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षातील सामाईक प्रवेश परिक्षेचा कार्यक्रम नियोजन असुन त्यासाठी कमी मुदतीच्या निविदा प्रक्रियाद्वारे पुरवठादार निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. सदरील प्रक्रियेस विलंब झाल्याचे दिसून आल्यास पर्यायी गतवर्षी काम केलेल्या सेवापुरवठादार यांच्याशी चर्चा केली असून त्यांचेकडून विहित कालावधीमध्ये कमी मुदतीच्या निविदा प्रक्रियेद्वारे काम करुन घेण्याचे तयारी ठेवली असल्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नमूद केले.

प्रस्तूत प्रकरणी उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ५ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

अ) प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेशाच्या प्रथम प्रवेश फेरी दरम्यान काही विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करण्यासाठीची पहिली, दुसरी व रुपये १,०००/- भरुन तिसरा टप्पा पूर्ण केलेला आहे, परंतू प्रवेश निश्चित करण्याचा अंतिम टप्पा म्हणजेच चौथा टप्पा पूर्ण केलेला नाही. अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेश निश्चितीबाबत प्राधिकरण बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली.

उक्त नमूद प्रकरणी श्री. अरविंद लाटकर हया विद्यार्थ्याचा दिनांक २८/०१/२०२१ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास अर्ज प्राप्त झाला, त्या अनुषंगाने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम प्रवेश फेरी दरम्यान असे एकुण १४ उमेदवार असल्याचे निर्दशनास आले. या १४ उमेदवारांना प्रथम प्रवेश फेरीमध्ये निवड करण्यात आलेल्या महाविद्यालयांतील रिक्त जागांची दुसऱ्या फेरीच्या निवड प्रक्रियेनंतर तपासणी केली असता ०५ महाविद्यालयांमध्ये रिक्त जागा उपलब्ध आहेत. ०९ महाविद्यालयांमध्ये दुसऱ्या फेरीच्या निवड प्रक्रियेतील रुजू होण्याच्या अंतिम दिनांकानंतर ज्या जागा रिक्त राहतील, अशा रिक्त जागांवर संबंधीत १४ उमेदवारांना गुणवत्ता व नियमावलीनुसार समायोजित करताना इतर गुणवत्ताधारक उमेदवारांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यांची दक्षता घेऊन सदरील उमेदवारांची त्यांना दावा केलेल्या महाविद्यालयामध्ये फेर-निवड करणे सीईटी कक्षास शक्य असल्याचे बैठकीमध्ये नमूद करण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी ज्या उमेदवारांचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास लेखी स्वरुपात निवेदन प्राप्त झालेली आहेत व उक्त प्रकरणी निवेदने प्राप्त होतील, अशा उमेदवारांच्या फेर-निवड करण्यास संबंधीत उमेदवारांचे शैक्षणिक हित लक्षा घेऊन नियमावलीनुसार उचित कार्यवाही करण्याबाबत प्राधिकरणाने आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना निर्देश दिले.

ब) अधिनियम २०१५ अस्तित्वात येणापूर्वीच्या (अर्थात सन २०१५-१६ पूर्वी) शैक्षणिक वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्रलंबित आहेत व अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान झालेली नाही, या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे आदेश पारीत केले आहेत,-

An Act to provide for regulation of admissions and fees by Unaided Private Professional Educational Institutions in the State of Maharashtra and for the matters



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

connected therewith or incidental thereto - Maharashtra Act No. XXVII of २०१५ came into force from १२/०५/२०१५. As per Section १० of the said Act, CET/CAP process for the Academic Year २०१५-१६ is excluded from the operations of the Act and, therefore, all matters regarding CET, CAP, etc have been applied from २०१६-१७ onwards. Since there is no provision of taking decision with retrospective effect, i.e. before Act came into force, all such matters regarding admissions, etc. will be decided by the concerned Directorates and concerned Department of Government and concerned Universities. Accordingly all such cases be returned to the concerned authorities for deciding as per the then provisions applicable to such matters.

क) अधिनियम २०१५ कलम ९(१) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता प्राधिकरणाचे क्रमांक संकीर्ण-२२२१/प्र.क्र.०३/प्रनिप्रा/१८८अ,दिनांक ०८/०२/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये **(परिशिष्ठ-फ)** तक्रार निवारण समिती करण्यात आली आहे, अधिनियम २०१५ कलम ९(५)(चार) नुसार "प्रवेशासंबंधीची कोणतीही तक्रार प्राधिकरणासमोर दाखल करता येईल व पंधरा दिवसांच्या आत व प्रवेशाच्या अंतिम दिनांकापूर्वी त्यावर निर्णय घेण्यात येईल" अशी तरतूद करण्यात आली आहे. तद्नुषंगाने कार्यवाही करुन अभ्यासक्रमनिहाय एकत्रित अहवाल प्राधिकरणास वेळोवेळी सादर करावा.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश प्रक्रिया तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या सर्व मान्यवर सदस्यांनी सुचना / प्रतिक्रिया प्राधिकरणास सादर करण्याची विनंती करण्यात आली. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : ८/५/२१

Admissions Regulating Authority, Mumbai
Maharashtra State